आदेश पत्र क. प्रस्तुत / जिल्हाधिकारी / कावि–1238 / 09
मौजा–भिलगांव प.ह.न. 15 तहसिल–कामठी
रा.मा.क 732 / एन.ए.पी.–34 / 2008–2009
जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर. दिनांक 29 / 09 / 2009

वाचले :– 1. सौ. संगीता गोपाल गुप्ता आणि श्रीमती पार्वतीदेवी राजाराम गुप्ता व श्री. यश गोपाल गुप्ता राहणार–915, अ, टिपरे गल्ली, न्यु ईतवारी रोड, नागपूर
2. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 44(1) आणि कलम 123 सह.

आदेश

सौ. संगीता गोपाल गुप्ता आणि श्रीमती पार्वतीदेवी राजाराम गुप्ता व श्री. यश गोपाल गुप्ता राहणार–915, अ, टिपरे गल्ली, न्यु ईतवारी रोड, नागपूर यांनी मौजा–भिलगांव पं.ह.नं. 15 तहसिल–कामठी सर्व्हे नंबर 151 / 1, 151 / 2 आराजी 1.62 हे. आर. म्हणजेच 16,200 चौ. मिटर ला निवासी वापरास अकृषिक परवानगी मिळण्याबाबत अर्ज सादर केला. त्या अनुषंगाने संबंधित विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यांत आले व जाहिरनामा काढण्यात आला. कोणाचेही आक्षेप विहीत कालावधीत प्राप्त झालेले नाहीत.

प्रकरणांत खाली नमुद केलेल्या विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र मुदतीत प्राप्त झालेले आहे.

1. सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्य निर्धारण विभाग शाखा कार्यालय, नागपूर
2. कार्यकारी अभियंता, अ.उ.दा.तारमार्ग बांधकाम विभाग, म.रा.वि.पा.कं.लि. नागपूर
3. कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद, नागपूर.
4. उपविभागीय अधिकारी, नागपूर
5. प्रभारी अधिकारी, भूसंपादन, नागपूर
6. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, नागपूर
7. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
8. तहसिलदार कामठी
9. ग्रामपंचायत–**भिलगांव**
10. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कमांक 3, नागपूर

अर्जदाराने गांव नमुना 7 / 12 चा उतारा, तलाठी अभिन्यास, अधिकार अभिलेख पंजी, गांव नमुना 8–अ, मोजणी नकाशा, व अभिन्यास सादर केलेले आहे. तसेच वरील सर्व विभांगानी अकृषिक परवाणगी देण्यास हरकत नाही असे कळविलेले आहे.

अर्जदारास विषयांकित प्रकरणी निवासी वापरास अकृषिक परवानगी मंजूर करावयाची असल्यामुळे भुखंडा खालील क्षेत्र 9467.225 चौ.मी. ला अकृषिक सारा रुपये 0.05 न. पै. प्रति चौ. मिटर प्रमाणे रुपये **474/–**,ग्रामपंचायत सेस अकृषिक सान्या एवढा रु. **474/–**, जिल्हापरिषद सेस अकृषिक सान्यावर रुपये **7.00** प्रमाणे रुपये **3318/–**, परावर्तीत सारा अकृषिक सान्याचे **5** पट रुपये **2370/–** असे एकुण रक्कम रुपये **6636/–** अर्जदाराने दिनांक **25/09/2009** ला चालान कमांक **94** अन्वये खजिना दाखल केली आहे.

वरील बाबी विचारात घेता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व त्या खालील नियम 1969 या अंतर्गत तरतुदीस अधिन राहून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 44(1) अन्वये अर्ज सादर केल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 44 अन्वये असलेल्या अधिकारास अनुसरुन मी जिल्हाधिकारी, नागपूर खालील अटीस अधिन राहून अर्जदार सौ. संगीता गोपाल गुप्ता आणि श्रीमती पार्वतीदेवी राजाराम गुप्ता व श्री. यश गोपाल गुप्ता राहणार–915, अ, टिपरे गल्ली, न्यु ईतवारी रोड, नागपूर यांनी मौजा–भिलगांव पं.ह.नं. 15 तहसिल–कामठी सर्व्हे नंबर 151/1, 151/2 आराजी 1.62 हे. आर. म्हणजेच 16,200 चौ. मिटर ला निवासी वापरास अकृषिक परवानगी मिळण्याबाबत खालील अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

1. ज्या प्रयोजनासाठी अकृषिक वापरास परवानगी दिलेली आहे त्या खेरीज जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवाणगी शिवाय इतर वापर अनुज्ञेय नाही.
2. अनुग्राही यांनी निवासी वापरास सुरुवात केल्यापासून एक महिण्याचे आंत तलाठी यांचे मार्फत तहसिलदार यांना वापर सुरु केल्याचा दिनांक कळविला पाहिजे.
3. अनुग्राही यांनी निवासी अकृषिक वापरास परवानगी मिळाल्याचे दिनांकापासून दरसाल प्रचलीत 0.05 न.पै. प्रती चौ. मी. दराने आकारणी दरात वेळोवेळी अमंलात येणा अकृषिक दर पुर्वलक्षी पध्दतीने जरी हमी कालावधी संपुष्टात आला नसला तरी लागू झाल्यास तो भरण्यास बंधनकारक राहील.
4. वरील अट कमांक 3 मध्ये नमूद केलेल्या अकृषिक आकारणीचा दर हा अंतरिम असून शासनाच्या मंजुरी प्रमाणे पुर्वलक्षी पध्दतीने बदलण्यास पात्र राहील. या व्यतीरिक्त स्थानिक उपकर भरणेही बंधनकारक राहील.

5. आदेशातील कोणत्याही अटीचा भंग झाल्याचे निर्दशनास आल्यास जिल्हाधिकारी नागपूर दंडनिय कारवाई करु शकतील. व अशा प्रकारे केलेला दंड हा जमीन महसूलाची थकबाकी समजून वसूल करण्यात येईल.
6. अनुग्राही यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमीनीच्या वापरास बदल व अकृषिक आकारणी) नियम 1969 नुसार वर नमुद केलेल्या आदेशातील अटी/शर्ती मान्य असल्याबद्दल विहीत नमुन्यात बंधपत्र लिहून दिले पाहिजे.
7. अकृषिक परवानगीच्या अनुषंगाने अभिन्यास मंजूर झालेल्या दिनांकापासून एक वर्षात जमीनीचा अकृषिक वापर सुरु न केल्यास अकृषिक परवानगी रद्द होईल.
8. विषयांकित जागेवर बांधकाम सुरु करण्यापुर्वी बांधकाम नकाशे सक्षम प्राधिकाराकडून, तसेच सहाय्यक संचालक, नगररचना मार्फत जिल्हाधिकारी यांची मंजूरी घ्यावी.
9. सदर अभिन्यासाची तालुका निरिक्षक भुमीअभिलेख, यांचे कडून जागेवर आखणी करुन घ्यावी. अभिन्यासाप्रमाणे आखणी करीत असतांना सभोवतातील मंजूर अभिन्यासातील रस्त्याशी योग्य रितीने समन्वय साधणे आवश्यक आहे. विषयांकित जमीनीसाठीचा प्रस्तावित पोच रस्ता मोजणी करुन तो मोजणी नकाशावर दर्शवावा. आखणी नंतर काही फरक आढळून आल्यास जागेवर आखणी केल्याप्रमाणे किंवा फरक नसल्यास जागेवर आखणी केल्यानुसार सर्दहु अभिन्यासाचा मोजणी नकाशासह आखणी अभिन्यासाच्या वास्तुशास्त्रज्ञांचे सहीने चार प्रतीत जिल्हाधिकारी मार्फत नगर रचना कार्यालयास मंजूरीस्तव या कार्यालयाकडे सादर कराव्या.
10. अभिन्यासाच्या जागेवर प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील सार्वजनिक उपयोगाकरीता राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासाखालील जागेचा एकुण क्षेत्रफळाच्या 10 टक्के (दहा टक्के) पेक्षा कमी असू नये.
11. सार्वजनिक उपयोगाकरीता प्रस्तावित केलेल्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळाच्या 10 टक्के असणे आवश्यक आहे.
12. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास भूखंड आखंताना ती नष्ठ न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत. तसेच रस्त्याचे दुतर्फा व बांधकाम परिसरातील मोकळया जागेत जास्तीत जास्त वृक्ष रोपण करुन त्याची देखभाल स्वखर्चाने करावी लागेल.

13. विद्यमान जुने/नविन सर्व प्रकारचे इमारत बांधकाम नागपूर म.न.पा. ला लागू असलेल्या इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली नुसार सामासिक अंतरात येत असल्यास पाडून टाकावे लागेल.
14. विषयांकित जमीनीतुन जाणाऱ्या विद्युत वाहीनी पासूनचे सामासिक अंतर हे अहवालात इंडियन ईलेक्ट्रीकसिटी रुल्स व दुरुस्ती, तसेच म. रा. विद्युत मंडळाच्या अद्यावत नियमानुसार असावे.
15. विषयांकित जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहीनी किंवा दुरध्वनी जात असेल तर ती रस्त्याचे कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
16. 220 के. व्ही च्या वरील तीन लाईनच्या दोन्ही बाजुने प्रत्येकी 25.00 मिटर जागा क्लिअरन्स करीता सोडण्यात यावी. म्हणजे एकूण अंतर 50 मिटर लाईनच्या क्लिअरन्स करीता यावी.
17. प्रस्तावित बांधकाम हे रेल्वे लाईनच्या हद्दी पासून 30 मिटर अंतराचे आंत नसावे.
18. विषयांकित जमीनीतुन पाण्याचे स्त्रोत्र असल्यास संबंधित विभागाचे (पाटबंधारे/जलसिंचन विभाग) आवश्यक ते ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. विषयांकित जमीनीस पोच असणे आवश्यक राहील.
19. भविष्य काळात भुखंडाचे विभाजन करता येणार नाही.
20. इतर स्थानिक प्राधिकरणाचे नियमाचे पालन करावे.
21. प्रस्तावित लेआउट चे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था व सिव्हरलाईन चे काम आवेदकास स्वखर्चाने करावे लागेल. तसेच उपरोक्त परिसरातील सांडपाणी रस्त्यावर वाहून येणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.
22. इमारत रेषा–रस्त्याचे मध्ये रेषेपासून दोन्ही बाजुने अंतर 12.00 मिटर असावे.
23. नियंत्रण रेषा–रस्त्याचे मध्ये रेषेपासून अंतर 25.00 मिटर असावे.
24. रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे क्रॉसींग (सी.डी. वर्क्स) इत्यादी पुर्व परवानगी शिवाय करण्यात येवु नये.

25. राष्ट्रीय महामार्गापासून 75.00 मिटरचे आंत कोणतेही बांधकाम करण्यात येवु नये. राष्ट्रीय महामार्गाजवळील जागेत बांधकाम करीत असतांना कार्यकारी अभियंता, रा.म. मार्ग यांची पुर्व परवाणगी घेणे बंधनकारक राहील.
26. रस्त्याचे हद्दीपासून लेआउटवर जाण्या–येण्याकरीता 7.50 मिटर रुंदिचा समांतर सेवा रस्ता असावा.
27. अभिन्यास मोजणी फी तालुका निरिक्षक, भुमीअभिलेख यांचे कडे भरण्यात आलेली आहे.
28. अभिन्यास मंजूरी शिवाय जागेचे विभाजन करता येणार नाही.
29. अभिन्यास मंजूरी शिवाय नोंदणी अधिकाऱ्यांनी खरेदी विक्रीचे व्यवहाराची नोंदणी करु नये.
30. सदर प्रकरणातील सर्व्हे नंबर 151/1, 151/2 चे अभिन्यासामध्ये भुखंड खालील एकुण क्षेत्रफळ 9,467.225 चौ. मिटर आहे. सदर क्षेत्राच्या 20 टक्के क्षेत्र 1,893.445 चौ. मिटर इतके होईल 1,893.445 चौ. मिटर क्षेत्राचे भुखंड राखीव ठेवावयाचे झाल्यास भुखंड कमांक 8 ते 12 यांचे एकुण क्षेत्रफळ 2,250.00 चौ. वर्ग मिटर आहे. जे भुखंडाखालील एकुण क्षेत्रफळाच्या 20 टक्के क्षेत्रफळापेक्षा अधिक आहे. सदर अभिन्यासाच्या जागेवर रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी व सांडपाण्याची व्यवस्था या किमान नागरीसुविधा जमिन मालकाने/विकासकाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे या सुविधा संबधित अभिन्यासाच्या वर उपलब्ध करुन दिल्याबाबत संबधित तहसिलदाराकडून तपासून उपरोल्लेखित भुखंडाच्या विक्रीबाबत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदर ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुय्यम निबंधकाव्दारे सदर भुखंडाच्या विक्रीची नोंद करण्यात येईल.
31. अट कमांक 30 मध्ये उपरोल्लेखित प्रमाणे रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था या सुविधा सदर जमिन मालकाने/विकासकाने अभिन्यासातील जागेवर पुरविलेल्या आहेत हे तपासून उपरोल्लेखित भुखंड विक्रीबाबत संबंधित तहसिलदाराकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित अभिन्यासातील उपरोल्लेखित भुखंड कमांक 8 ते 12 चे क्षेत्र 2,250.00 चौ. मिटर यांच्या विकीची/विक्रीच्या करारनाम्या ची नोंदणी सहदुय्यम निबंधक/दुय्यम निबंधक यांनी करु नये.

25. राष्ट्रीय महामार्गापासून 75.00 मिटरचे आंत कोणतेही बांधकाम करण्यात येवु नये. राष्ट्रीय महामार्गाजवळील जागेत बांधकाम करीत असतांना कार्यकारी अभियंता, रा.म. मार्ग यांची पुर्व परवाणगी घेणे बंधनकारक राहील.

26. रस्त्याचे हद्दीपासून लेआउटवर जाण्या–येण्याकरीता 7.50 मिटर रुंदिचा समांतर सेवा रस्ता असावा.

27. अभिन्यास मोजणी फी तालुका निरिक्षक, भुमीअभिलेख यांचे कडे भरण्यात आलेली आहे.

28. अभिन्यास मंजूरी शिवाय जागेचे विभाजन करता येणार नाही.

29. अभिन्यास मंजूरी शिवाय नोंदणी अधिकाऱ्यांनी खरेदी विक्रीचे व्यवहाराची नोंदणी करु नये.

30. सदर प्रकरणातील सर्व्हे नंबर 151/1, 151/2 चे अभिन्यासामध्ये भुखंड खालील एकुण क्षेत्रफळ 9,467.225 चौ. मिटर आहे. सदर क्षेत्राच्या 20 टक्के क्षेत्र 1,893.445 चौ. मिटर इतके होईल 1,893.445 चौ. मिटर क्षेत्राचे भुखंड राखीव ठेवावयाचे झाल्यास भुखंड कमांक 8 ते 12 यांचे एकुण क्षेत्रफळ 2,250.00 चौ. वर्ग मिटर आहे. जे भुखंडाखालील एकुण क्षेत्रफळाच्या 20 टक्के क्षेत्रफळापेक्षा अधिक आहे. सदर अभिन्यासाच्या जागेवर रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी व सांडपाण्याची व्यवस्था या किमान नागरीसुविधा जमिन मालकाने/विकासकाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे या सुविधा संबधित अभिन्यासाच्या वर उपलब्ध करुन दिल्याबाबत संबधित तहसिलदाराकडून तपासून उपरोल्लेखित भुखंडाच्या विक्रीबाबत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदर ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुय्यम निबंधकाव्दारे सदर भुखंडाच्या विक्रीची नोंद करण्यात येईल.

31. अट कमांक 30 मध्ये उपरोल्लेखित प्रमाणे रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था या सुविधा सदर जमिन मालकाने/विकासकाने अभिन्यासातील जागेवर पुरविलेल्या आहेत हे तपासून उपरोल्लेखित भुखंड विक्रीबाबत संबंधित तहसिलदाराकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित अभिन्यासातील उपरोल्लेखित भुखंड कमांक 8 ते 12 चे क्षेत्र 2,250.00 चौ. मिटर यांच्या विक्रीची/विक्रीच्या करारनाम्या ची नोंदणी सहदुय्यम निबंधक/दुय्यम निबंधक यांनी करु नये.

जिल्हाधिकारी नागपूर यांचे समोरील कामकाज

रा.मा.कं. 732 /एन.ए.पी.34/2008-2009

मौजा Bhilgaon, प.ह.नं. 15, तहसिल Kamptee

## अनुसूची पाच

(नियम 7 पहा)

नियोजन अधिका-याच्या अधिकारितेत असलेल्या जमिनीच्या धारकाला द्यावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी, नागपूर जिल्हयाच्या, कामठी तालुक्यातील, मौजा- Bhilgaon, प.ह.नं. 15 च्या भूमापन कमांक 151/1.82 आराजी 1.62 HR हे.आर. म्हणजेच 16200 चौ.मी. चे धारक 915 ... टिपरे गल्ली ... हलवारी रोड, नागपूर श्री Sangeeta Gupta Yash Gupta, Parmila Devi Gupta येथील रहिवासी

यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 44 अन्वये, यासोबतच्या परिशिष्ट एक मध्ये वर्णन केलेला आणि जागेच्या नकाशावर दर्शविलेला भू-मापन कमांक 151/1.82 अक्षरांनी 16200 चा भाग असलेल्या व चौ.मी. क्षेत्रफळ असलेला किंवा हयापेक्षा थोडया कमी अधिक मापाच्या असलेल्या भू-खंडाचा निवासी प्रयोजना साठी वापर करण्याच्या परवानगीकरिता नागपूर च्या जिल्हाधिका-यांकडे अर्ज केला आहे. आणि ज्या अर्थी, Bhilgaon च्या ग्रामपंचायत ने भूखंडाचे लेआउट ला अकृषिक करण्यास /बांधकामास परवानगी दिलेली आहे.

त्याअर्थी, आता, असे प्रमाणित करण्यांत येत आहे की, उक्त अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून आणि पुढील शर्तीवर उक्त भू-खंड Residential प्रयोजनासाठी वापरण्याची परवानगी देण्यांत येत आहे :-

1) . जमीन समगतल करणे व ती साफ करणे : ज्यासाठी परवानगी देण्यांत आली आहे त्याविशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविघातक परिस्थितीत प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

2) आकारणी : उक्त भूखंडाच्या बाबतीत यापूर्वी, बसविण्यात येणा-या आकारणीच्या ऐवजी अर्जदार दिनांक 31 जुलै 2009 रोजी समाप्त होणा-या हमी मुदतीमध्ये प्रत्येक वर्षासाठी रुपये 6636/-

COLLECTOR NAGPUR

(रुपये सात हजार सहाशे छत्तीस रुपये
फक्त ) वार्षिक आकारणी देईल आणि ती मुदत संपल्यानंतर जिल्हाधिका-यांकडून उक्त अधिनियमान्वये वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित आकारणी देईल.

(2-अ) कलम 47-अ अन्वये बसविण्यात यावयाची रुपांतरण कराची रक्कम परवानगी मंजूर केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरील.)

3) वापर : अर्जदाराने — निवासी —वापर याव्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि त्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा जिल्हाधिका-याच्या पुर्व मंजूरीशिवाय वापर करता कामा नये.

अर्जदाराने, यासंबतच्या परिशिष्ट दोन मध्ये असलेल्या शर्तींचे यथोचितरीत्यां पालन केले पाहिजे.

4) बांधकामाबाबतची कालमर्यादा : अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत उक्त भू-खंडावर भरीव व कायम स्वरुपाचे — बांधकाम — सुरु केले पाहिजे , त्याने तसे न केल्यास जिल्हाधिका-याकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

5 पट्टा देण्याबाबतचे दायित्व : अर्जदाराने, उक्त जमिनीवर आकारण्याजोगे सर्व कर, पट्टा आणि उपकर दिले पाहिजेत.

6. शास्तीविषयीचा दंड : (अ) अर्जदाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल त्या इतर कोणत्याही शिक्षेस बाध न आणता, जिल्हाधिका-यांस, तो निर्देशित करील इतकी आकारणी रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम 329 चे पोट-कलम (2) च्या अधीन तो निदेशित करील असा दंड भरल्यावर उक्त भू-खंड, अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्याचे शासन ठेवता येईल.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिकारपत्राच्या उल्लंघाविरुद्ध कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास जिल्हाधिका-याने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यास बदल करण्याबाबत, जिल्हाधिका-याने निदेश देणे वैध असेल आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे (इमारत किंवा बांधकाम) काढून टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

7) अधिनियमाचे उपबंध लागू असणे : या उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधास अधीन असेल.

<u>नकाशा</u>

परिशिष्ट एक

| लांबी व रुंदी | | पृष्ठभागाचे एकुण क्षेत्रफळ | सीमा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| उत्तर-दक्षिण | पूर्व-पश्चिम | | उत्तर-दक्षिण | पूर्व-पश्चिम | |
| [illegible] मंजूर केलेल्या आर्कि॰ प्लान प्रमाणे | | | | | |

परिशिष्ट दोन

1) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 अन्वये नियोजन प्राधिका-याने मान्यता दिलेल्या आराखड्यास अनुसरुन अर्जदाराने भू-खंडांवर बांधकाम केले पाहिजे.

2) अर्जदाराने इमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषांचे पालन केले पाहिजे आणि सोबतच्या नकाशातील ——————ने चिन्हांकित केलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवले पाहिजे.

3) हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तीस अधीन राहील :-

(अ) ——————

(ब) ——————इत्यादी, इत्यादी.

या गोष्टीची साक्ष म्हणून नागपूर च्या जिल्हाधिका-याने महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर 29.9.2009 ——————2009 रोजी आपली सही केली आहे.

Sanjeet Gupta

अर्जदाराची सही

COLLECTOR NAGPUR

30.09.09

For Collector Nagpur
(जिल्हाधिकारी नागपूर, करीता)

जिल्हाधिका-याची मोहोर

C.R.S. Gupta
(साक्षीदारांच्या सह्या व पदनामे) Advocate

(Arun Ghatode)
(साक्षीदारांच्या सह्या व पदनामे)

आम्ही असे जाहीर करतो, की जिने या सनदेवर सही केली आहे ती श्री. संजीत गोपाल गुप्ता व इतर-2 —————— ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहिती प्रमाणे असल्याचे म्हणत आहे तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

(सही) Sanjeet Gupta

Arun Ghatode